पुण्य नगरी

# ऑनलाईन गेमिंगच्या फसवणुकीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती



जळगाव : सायबर गुन्ह्यांपासून विद्यार्थ्यांना सजग करण्याच्या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, क्विकहील फाउंडेशनतर्फे जनजागृती केली जात आहे. बामनोद येथील पी.एस.यम.एस विद्यालयातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन गेमिंग व सायबरच्या गुन्ह्यांबाबत मार्गदर्शन करुन जनजागृती करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत गुरुवारी सायबर जनजागृती सत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता ५ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना ऑनलाईन गेमिंग फसवणूक, आर्थिक फसवणूक आणि इतर सायबर गुन्ह्यांविषयी विद्यार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक सायबर अनुभवांबाबत स्नेहल पाटील, वैष्णवी पाटील, देवेंद्र कापडे, भावेश कोळी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी शाळेचे शिक्षक उपस्थित होते. हा उपक्रम विद्यापीठाचे शिक्षक समन्वयक प्रा. राजू आमलेश यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला जात असून, क्विकहील फाउंडेशनच्या दीपू सिंग व गायत्री केशकर हे मार्गदर्शन करीत आहे. विद्यापीठाच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

Jalgaon Edition
Jul 26, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com